|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि/ विपनि-१८/ २३९ / २०१९ दि. ०९/०८/२०१९

प्रति,

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग

**विषय:- दि. ११ व १२ ऑगस्ट, २०१९ रोजीचे विद्यार्थी साहित्य संमेलन पुढे ढकलण्याबाबत..**
**संदर्भ :- पत्र क्र. कबचौउमवि/१४/विवि/ वि.सा.सं./ २१०/२०१९, दि. ०६.०८.२०१९**

महोदय,

मा. कुलगुरु महोदयांच्या परवानगीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले **विद्यार्थी साहित्य संमेलन मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव प्रांगणात रविवार, दिनांक ११ ऑगस्ट, व सोमवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१९** या कालावधीत आयोजित करण्यात येत असल्याचे संदर्भिय पत्रकान्वये कळविण्यात आले होते.

तरी प्राप्त निर्देशान्वये आपणास कळविण्यात येते की, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, या भागातील सांगली, सातारा, कोल्हापूर, ठाणे, नवी मुंबई, या जिल्हयांमध्ये संततधार पाऊसामुळे नदया नाल्यांना पूर येऊन या पूराने भयानक आणि भेसूर रौद्ररुप धारण केले त्यामुळे तेथील जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले आहे. महाराष्ट्रभर जलप्रलयामुळे आपत्ती आलेली आहे. याबाबी लक्षात घेता मानवतेच्या भावनेतून व जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयामध्ये गेल्या चार दिवसापासून संततधार पाऊस पडत आहे. तसेच हवामान खात्याच्या अंदाजानुसार नुसार या जिल्हयामध्ये दि. ०८ ते १२ ऑगस्ट, २०१९ या दरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे सदरचे साहित्य संमेलन पुढे ढकलण्यात येत असून साहित्य संमेलन आयोजन कालावधीबाबत यथावकाश कळविण्यात येईल. कृपया, सदरची बाबत संबंधितांना अवगत व्हावी, ही विनंती.

कळावे- धन्यवाद !

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

(डॉ.सत्यजित साळवे)
संचालक, विद्यार्थी विकास

**प्रतिलिपी-**

१) मा. प्राचार्य, मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

२) मा. अध्यक्ष व सन्माननिय सदस्य, विद्यार्थी साहित्य संमेलन समिती

३) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

**प्रत -**

१) उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय

२) सहायक कुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय

३) कक्ष अधिकारी, कुलसचिव कार्यालय